# प्रेस नोट

## " सोशल मिडीया कार्यशाळा "

जा.क्र. १४१ /माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांकः– १८/०३/२०१८

**भंडारा**: पोलीस मुख्यालय येथील मिटींग हॉलमध्ये १८ मार्च २०१८ रोजी मा. पोलीस अधिक्षक भंडारा विनीता साहू, अपर पोलीस अधिक्षक रश्मि नांदेडकर, यांचे उपस्थीतीत अभिकल्पन ग्रुप यांचे माध्यमातुन भंडारा पोलीस दलातील अधिकारी व कर्मचारी यांचे करीता कार्यशाळेचे आयोजन केले. अभिकल्पन ग्रुप मधील अर्पित तिवारी, आदेश परतेती, आदर्श शर्मा, यांनी सोशल मिडीया मॅनेजमेंट बाबत सखोल ज्ञान भंडारा पोलीस दलातील अधीकारी व कर्मचारी यांना दिले

सदर कार्यक्रमात दरम्यान मागर्दर्शन करताना मा. पोलीस अधिक्षक भंडारा विनीता साहू यांनी सांगीतले की, आजचे युग हे सोशल मिडीयाचे आहे, आपले सगळे व्यवहार व संवाद इंटरनेटच्या माध्यमातुन व्यापले आहे. अशा परीस्थीतीत सोशल मिडीयाचा वापर पोलीस दलात प्रभावी पणे जास्तीत जास्त व्हावा असे भंडारा जिल्हा पोलीस दलातील अधीकारी व कर्मचाऱ्यांना माहीती देण्याकरीता सदर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

सदर सोशल मिडीया कार्यशाळा दरम्यान पोलीस उपअधिक्षक (गृह) कुलकर्णी,उपविभागीय पोलीस अधिकारी भंडारा जोगदंड, उपविभागीय पोलीस अधिकारी साकोली डिसले, उपविभागीय पोलीस अधिकारी पवनी टिक्कस पोलीस मुख्यालय उपनिरीक्षक श्री. प्रधान जिल्हयातील सर्व पोलीस स्टेशनचे/शाखेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

कार्यशाळेचे संचालन पोउपनि. आडोळे व आभार प्रदर्शन पोलीस उपअधिक्षक (गृह) कुलकर्णी,यांनी केले.

(मपोउपनी. माया चाटसे)
महिला सेल भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९२१७४१६८१

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.